शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीच्या ठेव रकमेत वाढ करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः पूरक २०१८/प्र.क्र.२६८/३४
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २५ फेब्रुवारी,२०१९

वाचा-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.माजम-२००९/५७३/प्र.क्र.१००/३४, दि.०१/०८/२००९
२.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०१०/प्र.क्र.४२४/३४, दि.०९/०३/२०११
३.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०१२/प्र.क्र.२७८/३४, दि.२२/०२/२०१३
४.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज-२०१६/प्र.क्र.८१/३४ दि.२९.०३.२०१६
५.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मावज-२०१३/प्र.क्र.१९५/३४ दि.०२.०२.२०१९
६.संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) यांचे पत्र क्र. वृत्त-२०१९/पत्रकार सन्मान योजना/का-२/७४६ दि.०५.०२.२०१९

प्रस्तावना :-

पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा आकस्मिक मृत्यु झाल्यास त्यांना किंवा त्यांच्या कुटूंबियांस मदत करण्याच्या उद्देशाने “शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी (Trust)” ची शासन निर्णय संदर्भ क्र. १ अन्वये स्थापना करण्यात आली आहे. सदर निधीमध्ये उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय/ज्ञापन अन्वये एकूण रु.१०.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधी राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करुन त्यांवर मिळणाऱ्या व्याजातून पत्रकारांना आर्थिक मदत केली जाते.

राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांच्याप्रती आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी “आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान” योजना सुरु करण्यास संदर्भाधीन दि. ०२/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेवरील खर्च भागविण्यासाठी शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीमध्ये ठेव रक्कम रु.१०.०० कोटी वरुन रु.२५.०० कोटी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढील निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

ज्येष्ठ पत्रकारांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या "आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना" या वरील खर्च भागविण्याठी “शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीची” ठेव रक्कम रुपये १०.०० कोटी (रुपये दहा कोटी फक्त) वरुन रुपये २५.०० कोटी(रुपये पंचवीस कोटी फक्त) करण्यास तसेच सदर वाढीव रुपये १५.०० कोटी (रुपये पंधरा कोटी फक्त) इतकी रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या प्रयोजनासाठी येणारा खर्च सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र. ए-६, २२२०- माहिती व प्रसिध्दी, ०१- चित्रपट, ००१- संचालन व प्रशासन (००) (०१), प्रसिध्दी संचालक (२२२० ००४३) ३१- सहायक अनुदान या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ मध्ये पूरक मागणीद्वारे अर्थसंकल्पीत केलेल्या निधीतून मासिक निधी विवरणपत्रानुसार विहित कार्यपध्दीतीचा अवलंब करुन भागविण्यात यावा.

३. "शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी" (Trust) ची ठेव रक्कम रुपये १५,००,००,०००/- (रुपये पंधरा कोटी फक्त) रकमेचे आहरण व संवितरणाचे अधिकार लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना देण्यात येत आहेत. सदर खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांची राहील.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२७/२०१९ व्यय-४ दि.२२ जानेवारी,२०१९ अन्वये त्यांच्या प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२५१७१२३०२००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.02.25 17:14:54 +05'30'

(रा.ना.मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
६. सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई, नागपूर
९. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई, नागपूर
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११.उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
१२.लेखाधिकारी (आहरण व संवितरण), मुंबई
१३.सर्व जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४.निवड नस्ती (का.३४) सामान्य प्रशासन विभाग